## One Day Workshop of Non Teaching Staff

**Name of the Programme:** One Day Workshop of Non Teaching Staff

**Organizer:** IQAC, Bharatiya Mahavidyalaya, Amravati

**Date:** 8th September, 2017

**Venue:** Bharatiya Mahavidyalaya, Amravati

**Chairperson:** Dr. R. B. Bijawe, President, Bharatiya Vidya Mandir

**Chief Guest/ Speaker:** Dr. Mahendra Mete, Shivaji Arts, Commerce College Amravati
Dr. Vilas Manker, Registrar, Administrative Services, pre-Training Centre

**Non-Teaching Staff Participated:** 40

**Programme Outcome:**

The workshop was organised on **'The Role of Non-Teaching Staff in Qualitative management of Academics & Administration of the college'.** The speaker emphasized that the non-teaching staff plays a major role in the management of the college administration.

The non-teaching staff was effectively motivated to contribute positively to the smooth functioning of the college. They decided to improve their work pattern to improve their efficiency of work for the development of the college.





BHARATIYA MAHAVIDYALAYA Amravati.

(IQAC Co-ordinator)

जनमाध्यम
गुरुवार ७ सप्टेंबर, २०१७
@janmadhyamonline

## संक्षिप्त

**शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसाठी भारतीय महाविद्यालयात कार्यशाळा**

**अमरावती**- महाविद्यालयाच्या शैक्षणीक व प्रशासकीय गुणावत्तापुर्ण व्यवस्थापनात शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची भूमिका या विषयावर विद्यापीठस्तरीय एकदिवसीय कार्यशाळेचे ८ सप्टेंबर रोजी भारतीय महाविद्यालयात आयोजन करण्यात आले आहे. कार्यशाळेत श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ.महेंद्र मेटे, आयएएस पुर्व प्रशिक्षण केंद्राचे अधिक्षक विलास मानकर, भारतीय महाविद्यालय मोर्शीचे सेवानिवृत्त अधिक्षक रोहीत तिवारी मार्गदर्शन करतील. संस्थेचे अध्यक्ष बिजवे अध्यक्षस्थानी लाभतील.

हिंदुस्थान
हिन्दुस्थान ७।९।२०१७

## एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन

अमरावती (प्रतिनिधी) : स्थानिक भारतीय महाविद्यालयाच्या वतीने दिनांक ८ सप्टेंबर रोजी महाविद्यालयाच्या शैक्षणिक व प्रशासकीय गुणवत्तापुर्ण व्यवस्थापनात शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची भूमिका या विषयावर विद्यापीठ स्तरीय एक दिवसाच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेत डॉ. महेंद्र मेटे ग्रंथपाल,श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, विलास मानकर अधिक्षक आय.ए.एस. पुर्व प्रशिक्षण केंद्र, तथा रोहित तिवारी, सेवानिवृत्त अधिक्षक, भारतीय महाविद्यालय, मोर्शी या मान्यवरांचे मार्गदर्शन लाभणार असून संस्थेचे अध्यक्ष आर.बी. बिजवे हे कार्यक्रमाचे अध्यक्ष असतील. तसेच संस्थेचे सरचिटणीस डॉ. एस.व्ही. कुळकर्णी हे समारोपीय कार्यक्रमाचे अध्यक्ष असतील.

अमरावती विद्यापीठाअंतर्गत येणाऱ्या महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी जास्तीत जास्त संख्येने या कार्यशाळेस उपस्थित राहून मान्यवरांच्या मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. आराधना वैद्य यांनी केले आहे.

दि. 13/09/2017

जनमाध्यम

# 'जिद्द' परिस्थितीवर मात करते- डॉ. महेंद्र मेटे

**अमरावती/का.प्र.**

परिस्थिती कितीही विपरित असली तरी काहितरी शिकण्याची जिद्द असलेला व्यक्ती परिस्थितीवर मार्ग काढुन आपल्या ध्येयापर्यंत पोहोचतो. प्रत्येकाने जिद्द आपल्या अंगी बाळगावी असे प्रतिपादन डॉ.महेंद्र मेटे यांनी केले. भारतीय महाविद्यालय येथे 'महाविद्यालयाच्या शैक्षणिक व प्रशासकीय गुणवत्तापुर्ण व्यवस्थापनात शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची भूमिका' या विषयावर विद्यापीठस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळेत प्रमुख वक्ते म्हणून श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ.महेंद्र मेटे बोलत होते.

या कार्यशाळेला भारतीय प्रशासकीय सेवा पुर्व प्रशिक्षण केंद्राचे अधिक्षक विलास मानकर, भारतीय महाविद्यालय मोर्शीचे सेवानिवृत्त अधीक्षक रोहित तिवारी, अध्यक्ष डॉ. बिजवे, प्राचार्या डॉ.आराधना वैद्य आदिंची उपस्थिती लाभली. कार्यशाळेची भुमिका विषद करतांना कर्मचाऱ्यांना भेडसावणाऱ्या समस्यांवरही मान्यवरांनी प्रकाश टाकला. डॉ.महेंद्र मेटे यांनी संपुर्ण प्रणाली आयसीटी बेसवर आधारित असण्याची आवश्यकता विषद केली. ग्रंथालयासह सर्व विभागाचे संगणकीकरण करीत असतांनाच शहरे आणि ग्रामीण भागाला भेडसावणाऱ्या समस्यांमध्ये उदभवणाऱ्या समस्यांवरही त्यांनी प्रकाश टाकला. तर विलास मानकर यांनी शिक्षकेत्तर



कर्मचारी शिक्षण क्षेत्राचा आधारस्तंभ असुन महाविद्यालयात सांभाळून ठेवाव्या लागणाऱ्या बँकेचे स्वरुप, पेंशन केस तसेच विविध नियम या बाबतीतही तपशीलवार मार्गदर्शन केले. रोहित तिवारी यांनी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा २०१६ बाबत माहिती दिली.

विद्यार्थी महाविद्यालयाचा केंद्रबिंदू असून त्याला आवश्यक ती मदत योग्यवेळी करण्यात यावी असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी डॉ. कुळकर्णी, संजना अनवाणी, अलका थोरात, नेहा हरले, उज्वला हिरुळकर आदींसह शिक्षकेत्तर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

अमरावती ■ शुक्रवार, ८ सप्टेंबर २०१७ ■ वर्ष ३५ ■ अंक ६८ ■ पृष्ठ १२ ■ किंमत रु. ४.०० ■ संपादक : दिलीप एडतकर

विदर्भ मतदार

बहुजनांचा बुलंद आवाज

# आज भारतीय महाविद्यालयात कार्यशाळा

अमरावती (प्रतिनिधी): स्थानिक भारतीय महाविद्यालयाच्या वतीने ८ सप्टेंबर रोजी, महाविद्यालयाच्या शैक्षणिक व प्रशासकिय गुणवत्ता पूर्ण व्यवस्थाप नात शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची भूमीका या विषयावर विद्यापीठ स्तरीय एक दिवसाच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत डॉ. महेंद्र मेटे, ग्रंथपाल, श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती, विलास मानकर, अधिक्षक, आय.ए.एस. पुर्व प्रशिक्षण केंद्र अमरावती तथा रोहित तिवारी, सेवानिवृत्त अधिक्षक, भारतीय महाविद्यालय, मोर्शी या मान्यवरांचे मार्गदर्शन लाभणार असून संस्थेचे अध्यक्ष आर. बी. बिजवे हे कार्यक्रमाचे अध्यक्ष असतील. तसेच संस्थेचे सरचिटणीस डॉ. एस.व्ही. कुळकर्णी हे समारोपीय कार्यक्रमाचे अध्यक्ष असतील. अमरावती विद्यापीठातंर्गत येणाऱ्या महा विद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी जास्त संख्येने या कार्यशाळेस उपस्थित राहून मान्यवरांच्या मार्गदशाचा लाभ घ्यावा असे आवाहन महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. आराधना वैद्य यांनी केले आहे.